

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सलग्रीत

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

# भारतीय महाविद्यालय,मोर्शी

# राष्ट्रीय सेवा योजना

## उन्नत भारत अभियान

# विशेष श्रमसंस्कार शिबीर

## दत्तक ग्राम लाडकी (बु.)

ता. मोर्शी, जि. अमरावती

# अहवाल

दि.११ जानेवारी २०१९ ते दि.१७ जानेवारी २०१९

शिक्षीत भारत-स्वच्छ भारत- स्वस्थ भारत-स्वावलंबी भारत - संपन्न भारत

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती**

# राष्ट्रीय सेवा योजना

विशेष श्रमसंस्कार शिबिर (दत्तक ग्राम लाडकी बु.)

सन २०१८-१९ (अहवाल)

(दिनांक ११/१/२०१९ ते १७/१/२०१९ )

| | | |
|---|---|---|
| प्राचार्याचे नांव | : | **मा. डॉ. श्री. सुरेश भ. बिजवे** |
| **कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव** | : | **डॉ. संदिप म. राऊत** |
| **सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव** | : | **डॉ. सावन म. देशमुख** |
| **महिला कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव** | : | **डॉ. जे. एल. रामटेके** |

**गुरूवार :-** दि. १०/०१/२०१९ ला दुपारी २.३० वाजता ऑटोरिक्षाने स्वयंसेवकाचे शिबिरस्थळी आगमन झाले या दिवशी दत्तकग्राम लाडकी (बु.) येथील सरापंच मा. सौ. सुनंदाताई भुयार , गावाचे उपसरपंच डॉ. डिगांबरराव बुरंगे तसेच ग्रा.पं. सदस्यगण यांनी डॉ. संदिप एम. राऊत (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी), डॉ. सावन देशमुख तसेच डॉ. कु. जे.एल. रामटेके यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. जि. प. प्राथमिक शाळेच्या संपुर्ण परिसर व जगन्नाथ भारती महाराज मंदिराचा सर्व परिसर स्वयंसेवकांनी स्वच्छ केला तसेच जगन्नाथ भारती महाराज मंदिरासमोर ४ X ४ X ५ या आकाराचा शोष खड्डा स्वयंसेवकांनी तयार केला. यानंतर गावकरी मंडळींशी चर्चा करण्यात आली. रा.से.यो. स्वयंसेवकांनी सात गटामध्ये विभागणी करून गट प्रमुखाची नियुक्ती करण्यात आली. अशा प्रकारे पहिल्या दिवशीचा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

**शुक्रवार :-** दि. ११/०१/२०१९ ला सकाळी ५.०० वा. ग्राम स्वच्छता करण्यात आली. सकाळी ६.०० वा. योगासने व प्रार्थना आणि ७.०० वा. प्रभातफेरी घेण्यात आली. तसेच सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन मा. श्री. सुखदेवराव राऊत, सदस्य महाविद्यालयीन विकास समिती, भा.म. वि. मोर्शी, यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. त्यांनी आपल्या भाषणातुन स्वयंसेवकांना शिस्त, स्वावलंब, नियोजन व श्रमदानाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रा. डॉ. सुरेश भ. बिजवे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबीरामच्या माध्यमातुन सुप्त गुणांचा विकास, सामाजिक जागृती, स्वच्छतेचे महत्व आत्मसात करून प्रत्येकांनी स्वयं प्रकाशित व्हावे असे सांगितले. मा. डॉ. बी.एस. चंदनकर यांनी विदयार्थींना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व पटवून दिले. मा. श्री. नविनकुमार पेठे यांनी पर्यावरणाचा दृष्टीतून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. गावाच्या सरपंचा सौ. सुनंदाताई भुयार यांनी तरूणाईच्या माध्यमातुन गावाचा विकास शक्य आहे असे सांगितले. तर उपसरपंच मा. डॉ. दिगांबरराव बुरंगे यांनी शिबीराच्या माध्यामातून विदयार्थ्यांना ग्रामविकासाचे धडे द्यावे सांगितले. या प्रसंगी श्री. राहुल वडे, (पोलीस पाटील, दत्तकग्राम लाडकी बु.) , श्री. दिलीप वानखडे, माजी पं.स. सदस्य संदिप लव्हाळे, तंटामुक्ती अध्यक्ष प्रविणभाऊ कोहळे, राजुभाऊ वानखडे (ग्रा.पं. सदस्य) सुधाकरजी खैरकर, श्री. विजय भाकरे, सर्व ग्रामपंचायत सदस्यगण व गावकरी मंडळी उपस्थित होते.

उद्घाटन कार्यक्रमामध्ये रा.से.यो. विभागाच्या वतीने लाडकी येथील जिल्हा परिषद शाळेला वाटर फिल्टर भेट देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. जे.एल. रामटेके (महिला कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.) मॅडम यांनी केली. तर प्रास्ताविक प्रा. डॉ. संदिप राऊत (कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. ) यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन डॉ. सावन मा. देशमुख (सहा. कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.) यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रा. डॉ. टेंभुर्णे मॅडम, डॉ. आर. जी. बांबोळे, डॉ. बी.जे. साबळे, डॉ. एस.व्ही. टोपरे , प्रा. व्ही. व्ही. खांडेकर, प्रा. डी.एन. काळे, प्रा. ए.एस. पाझारे, प्रा. घनश्याम दाणे, डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रा. मनोज वाहाने, श्री. रूपेश मेश्राम तसेच प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

सायंकाळी ६.०० वाजता प्रार्थना 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ' 'इतनी शक्ती हमे दे न दाता,' राष्ट्रवंदना केली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रार्थनेवर विचार व्यक्त केले.

रात्री ८ वाजता मा. श्री. श्रीकांत उमक (मोर्शी तालुका समन्वयक, पाणी फाऊंडेशन) आणि मा. राणी सुर्वे (मोर्शी तालुका समन्वयक, पाणी फाऊंडेशन) यांनी 'जलसंधारण व मनसंधारण ही काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मा. श्री. वामनराव उमेकर (लाडकी बु.) हे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते.

**शनिवार :- दि. १२/०१/२०१९**

सकाळी ०५.०० वा. ग्राम स्वच्छता करण्यात आली. सकाळी ६.०० वा. योगासने, प्रार्थना, प्रभातफेरी आणि ९ ते १२ वाजे पर्यंत भुमीगत बंधाऱ्यावर श्रमदान केले. त्याच बरोबर स्वयंसेवकांनी गावामध्ये वेगवेगळ्या ठिकाण शोषखड्यांची निर्मिती केली.

त्यानंतर ३ वा. ला बौध्दिक सत्रामध्ये 'व्यक्तीमत्व विकास' या विषयांवर मा. श्री. सलील चिंचमलातपुरे सचिव, भारतीय विद्यामंदिर अमरावती यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. आर.जी. बांबोळे होते. तसेच कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्री.गंगाधरराव भुयार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रा.से. यो. स्वयंसेविका कु. सोनाली लबडे हिने केले व आभार कु. कांचन बडनगरे हिने मानले.

रात्री ६.०० वाजता गुरूदेव सेवा मंडळ लाडकी (बु.) व रा.से.यो. स्वयंसेवक यांनी सामुदायिक प्रार्थना व रा.से.यो. प्रार्थना केली.

रात्री ८.०० वाजता रा.से.यो. स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले व या प्रसंगी गावातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु. शुभांगी खुजे हिने केले व आभार प्रज्वल टेकाडे यांने मानले.

**रविवार :- दि. १३/०१/२०१९ ला**

सकाळी ग्रामस्वच्छता , प्रार्थना, योगासने व प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच ९.०० ते १२.०० वाजे पर्यंत भुमिगत बंधाऱ्यावर श्रमदान केले. व शोषखड्यांची निर्मिती केली.

२.३० वा. बौध्दिक सत्रामध्ये ग्रामीण भागातील शासकीय आरोग्य योजना या विषयावर मा. डॉ. शामसुंदर निकम आणि मा. श्री. राजेश पिदडी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष मा. प्रा. व्ही.व्ही. खांडेकर होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु. सोनाली लबडे हिने केले व आभार प्रदर्शन कु. शुभांगी खुजे हिने केले. या कार्यक्रमाला स्वयंसवेक व गावकरी मंडळी उपस्थित होते.

रात्री ८.०० वा. मनोरंजनातून समाजप्रबोधन या विषयावर मा. श्री. विदयाराज कोरे यांनी आपल्या उत्कृष्ट शैलीतुन लोकांना मनोरंजनातुन समाजप्रबोधन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संदिप राऊत होते.

प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भैय्यासाहेब चिखले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. वैष्णवी चौधरी हिने केले आणि आभार कु. साक्षी राऊत हिने मानले.

या कार्यक्रमाला स्वयंसेवक तसेच गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सोमवार :– दि. १४/०१/२०१९**

यादिवशी सकाळी ग्रामस्वच्छता , प्रार्थना, योगासने व प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच ९.०० ते १२.०० वाजे पर्यंत भुमिगत बंधाऱ्यावर श्रमदान केले.

त्यानंतर दुपारी ३ ते ४.०० वा. पर्यंत मा. प्रा. रूपेश पाटील सर यांनी 'भारतातील वर्तमान शिक्षण प्रणाली' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अरविंद पाझारे होते व प्रमुख अतिथी मा. श्री. गणेशराव राऊत हे होते. आणि दुपारी ४.०० ते ५.०० या दुसऱ्या सत्रामध्ये 'राष्ट्रीय सेवा योजना व युवक' या विषयांवर मा. प्रा. घनश्याम दाणे यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. पल्लवी कनेर हिने केले व आभार कु. अंकीता जिकाटे हिने मानले. या कार्यक्रमाला स्वयंसेवक व गावकरी मंडळी उपस्थित होते.

सायंकाळी ६.०० वा प्रार्थना झाली. रात्री ८.०० वा. कवि सम्मेंलन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आणि कार्यक्रमामध्ये कवि मा. प्रा. ज्ञानेश्वर गटकर, कवि मा. सौ. शितल वैराळे , कवि विशाल मोहोड तसेच मा. डॉ. स्वप्निल देशमुख यांनी उत्कृष्ट कविता सादर केल्या. त्याच बरोबर विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन मा. डॉ. जे.एल. रामटेके उपस्थित होत्या. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. राजेश बुरंगे (संचालक, रा.से.यो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती) उपस्थित होते. त्याच बरोबर प्रा. श्री. संतोष यावले (क्षेत्रीय समन्वयक) देखील उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन मा. प्रा. डॉ. संदिप राऊत यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा. प्रा. घनश्याम दाणे यांनी केले.

**मंगळवार :– दि. १५/०१/२०१९**

यादिवशी सकाळी ग्रामस्वच्छता , प्रार्थना, योगासने व प्रभात फेरी काढण्यात आली. सकाळी ९.०० वाजता पासुन ते १२.०० वाजे पर्यंत भुमिगत बंधाऱ्यावर श्रमदान केले.

त्यानंतर दुपारी २.३० ते ४.०० वा. मा. श्री. मनिष खांडपासोळे यांनी ''तारूण्याच्या उंबरठ्यावर'' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांना मार्गदर्शन देखील केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रा. डॉ. बी.जे साबळे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्री. गणेरराव टाकोडे उपस्थित होते. तसेच दुपारी ४ ते ५ वा. 'अंधश्रध्दा निर्मुलन' या विषयावर मा. श्री. कुऱ्हेकर सर यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वयंसेविका कु. ऋतुजा काळमेघ हिने केले आणि आभार प्रदर्शन कु. प्रिती भुजाडे हिने केले.

रात्री ८.३० वा. ''अज्ञात गांधी'' या विषयावर मा. श्री. आशिष लोहे सर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन मा. डॉ. एस. व्ही टोपरे, प्रमुख अतिथी प्रा. व्ही.व्ही. खांडेकर , मा. श्री. सुभाषराव भुयार, श्री. राहुल बरडे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. घनश्याम दाने यांनी केले. तसेच प्रास्ताविक डॉ. संदिप राऊत यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सावन देशमुख यांनी केले.

बुधवार :- दि. १६/०१/२०१९

यादिवशी सकाळी ग्रामस्वच्छता , प्रार्थना, योगासने व प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच ९.०० ते १२.०० वाजे पर्यंत श्रमदानाच्या माध्यमातुन शोषखड्यांची निर्मिती करण्यात आली.

दुपारी ३.०० वा. च्या बौध्दिक सत्रामध्ये ''महिला सक्षमीकरण'' या विषयावर मा. अॅड. मंजुषा खांडेकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मा. डॉ. जे.एल. रामटेके मॅडम उपस्थित होत्या. तसेच प्रमुख अतिथी म्हणुन मा. सौ. कुमुदिनी कोरडे (संघटक, राष्ट्र सेवा दल पुणे) मा. डॉ. एल. आर. टेंभुर्णे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दुर्गा सहारे हिने केले. व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनुराधा वानखडे हिने केले. कार्यक्रमाला स्वयंसेवक व गावकरी मंडळी उपस्थित होते.

रात्री ६.०० वा. प्रार्थना घेण्यात आली. रात्री ८.०० वा. रा.से.यो स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादरा केले व त्यानंतर कॅम्प फायरचे आयोजन करण्यात आले. त्या प्रसंगी सर्व रा.से.यो. स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**गुरूवार :- दि. १७/०१/२०१९**

सकाळी ग्रामस्वच्छता , प्रार्थना, योगासने व प्रभात फेरी काढण्यात आली.

'स्वच्छ भारत स्वस्थ भारत' या संकल्पनेवर आधारीत १० जानेवारी ते १७ जानेवारी २०१९ या कालावधीत संपन्न झालेल्या विशेष श्रम संस्कार शिबीराचा समारोप १७ जानेवारी २०१९ ला संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मा. श्री. अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) मा. डॉ. सतिश कुळकर्णी (सरचिटणीस भारतीय विद्यामंदिर, अमरावती) कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.डॉ. एस.बी. बिजवे (प्राचार्य भा.म.वि. मोर्शी) तसेच अतिथी म्हणून मा. श्री. सुखदेवराव राऊत (सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती, भा.म.वि. मोर्शी) मा. डॉ. बी.एस. चंदनकर (सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती, भा.म.वि. मोर्शी) मा. श्री. जी.एस. मेश्राम (माजी प्राचार्य, भा.म.वि. मोर्शी) मा. श्री. डॉ. दिगांबरराव बुरंगे (उपसरपंच, ग्रा.वपं. लाउकी बु.) मा. सौ. सुनंदा भुयार (सरपंच, ग्रा. पं. लाडकी बु.) मा. श्री. राहुल वडे (पोलीस पाटील, लाडकी बु) मा. श्री. संदिप लव्हाळे, मा. श्री. प्रविण कोहळे, मा. श्री. दिनेश देऊळकर , मा. श्री. डी. एस. गोबरे , मा. श्री. राजुभाऊ वानखडे, मा. श्री. सुधाकरराव खैरकर, मा. श्री. हरिभाऊ कुरवाडे, मा. श्री. दिलीपराव वानखडे व सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

समारोपीय कार्यक्रम मुख्य अतिथी मा. अनंतरावजी सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांच्या अंगी , शिस्त स्वावलंबन, व सर्वांगिन विकास हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीरातुन होत असतो. तसेच शिबीर दरम्यान प्राप्त झालेल्या ज्ञानरूपी शिदोरीचा उपयोग विद्यार्थ्यांनी आयुष्यभर करावा असे विचार व्यक्त केले.

तर दुसरे प्रमुख अतिथी मा. डॉ. बी. एस. चंदनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समारोपीय कार्य्रकमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. डॉ. एस.बी. बिजवे यांनी स्वयंसेवकांच्या कामाची प्रशंसा करून रा.से.यो. शिबीरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या प्रसंगी गावाचा पहिल्या नागरिक सरपंच मा. सौ. सुनंदाताई भुयार यांनी आपले विचार मांडतांना म्हटले की, या शिबीर कालावधी मध्ये रा.से.यो. स्वयंसेवकांनी गावकऱ्यांची मन जिंकुन घेतली असे सांगितले. डॉ. दिगांबरराव बुरंगे (उपसरपंच, ग्रा. पं. लाडकी बु.) यांनी आपले विचार व्यक्त करतांना स्वयंसेवकाच्या कामाचा गौरव करून कौतुक केले. तसेच श्रमसंस्कार शिबीर सर्व बाबतीत यशस्वी झाल्याचे सांगितले.

गावाचे पोलीस पाटील राहुलजी वडे यांनी रा.से.यो विशेष शिबीरामुळे गावामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. शिवाय स्वयंसेवकांच्या कार्यामुळे गावातील लहान विद्यार्थ्यांवर संस्कार झाल्याचे सांगितले. या प्रसंगी कु. स्वामीनी ज्ञानेश्वर वरघट, कु. शुभांगी गजानन खुजे, आणि प्रज्वल टेकाडे या स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदिप राऊत यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सात दिवसीय लेखाजोखा सांगितला. तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रा.से.यो. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे.एल. रामटेके मॅडम यांनी केले. तर आभार प्रा. सावन देशमुख सर यांनी मांडले.

या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबीरामध्ये जलसिंचनाच्या दृष्टीने भुमीगत बंधारा 10 x 6 x 10 असा तयार केला. दोन मोठे शोषखड्डे 8 x 8 x 8 , दोन लहान शोषखड्डे 4 x 4 x 5 असे तयार केले. तसेच शिबीरामध्ये श्रमदानाबरोबर नियमीत कार्यक्रमात ग्राम स्वच्छता , योगासने, प्रार्थना, प्रभात फेरी , श्रमदान, बौध्दिक कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम ही सर्व कामे यशस्वीरित्या पुर्ण झाली. तसेच शिबीराच्या यशस्वीतेकरीता डॉ. एस.बी. बिजवे, प्रा. आर.जी. बांबोळे, प्रा. व्ही. व्ही. खांडेकर, प्रा. दिपक काळे, प्रा. एल. आर. टेंभुर्णे, डॉ. शिरिष टोपरे, डॉ. भगवान साबळे, प्रा. ए. एस. पाझारे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारीवृंद यांचे कार्य लाभले.

याच बरोबर लाडकी (बु.) येथील सरपंचा सौ. सुनंदाताई भुयार , उपसरंपच श्री. डॉ. दिगांबरराव बुरंगे, पोलीस पाटील राहुल वडे, माजी. पं.स. सदस्य संदिपजी लव्हाळे, प्रविण कोहळे, राजुभाऊ वानखडे, सुधाकर खैरकर, श्री. विजय भाकरे, विजय उमेकर, दिलीप वानखडे, मंगेशभाऊ टाकोडे, गणेशराव राऊत, सुभाषराव भुयार, हरिष निशान व येथील सर्व ग्रामवासियांचे सहकार्य लाभले.

ग्रामवासियांच्या उत्तम सहकार्यामुळे सात दिवसाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर यशस्वी होण्यास मोठी मदत झाली.

**शिबीरादरम्यान राबविलेले विशेष उपक्रम :-**

१) जि.प. शाळा, लाडकीला **वॉटर फिल्टर** भेट देण्यात आले.
२) भुमिगत बंधाऱ्याची निर्मीती – १० फुट लांब, ६ फुट रूंद, १० फुट खोल
३) दोन मोठे शोष खड्डे – ८ फुट लांब, ८ फुट रूंद, ८ फुट खोल
४) दोन लहान शोष खड्डे – ४ फुट लांब, ४ फुट रूंद, ५ फुट खोल
५) अंगणवाडी लाडकी बु. – प्रतिमा भेट.
६) कु. राधा (अपंग मुलगी) – नविन वस्त्र भेट.
७) गौतम गाडे व त्यांची मातोश्री – यांना वस्त्रे भेट.

Prof.Incharge
N.S.S.UNIT
Bharatiya Mahavidyalaya,Morshi
डॉ. संदिप म. राऊत
कार्यक्रम अधिकारी
रा.से.यो.
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi.
डॉ. सुरेश भ. बिजवे
प्राचार्य
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

उद्घाटन समारंभ दि. १६-३-२०१९




रा. से. यो शिबिर उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय विचार व्यक्त करताना डॉ. सुरेश. म. बिजवे प्राचार्य, भारतीय महाविद्यालय मोर्शी.




उद्घाटन प्रसंगी विचार व्यक्त करताना डॉ. वी. एस. चंदनकर सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती भा. म. वि. मोर्शी.

दि. २२/०३/२०१९ शुक्रवार




रा. से. यो शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी विचार व्यक्त करताना श्री सुखदेवराव राउत सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती भा. म. वि. मोशी




रा. से. यो विभागातर्फे जि. प. पुर्व माध्यमिक शाळा खाडकी (कु) ला वाटर फिल्टर भेट देताना मान्यवर

दि. १०/०१/२०२१ शुक्रवार

शोषखड्डा




रा. से. यो. स्वंयसेवकानी जगन्नाथ भारती महाराज संस्थान लाडकी(बु) येथे शोषखड्डयाचे निर्माण करताना




रा. से. यो स्वंयसेवकानी निर्माण केलेल्या शोषखड्डा निरिक्षण करताना उपस्थित मान्यवर.

दि. २२/०१/२०१९ बौद्धिक सत्र



रा. से. यो शिबिरामध्ये व्यक्तीमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन करताना मा. श्री सलील्जी चिंचमलातपुरे सचिव, भारतीय विद्यामंदिर अमरावती.




रा. से. यो, बौद्धीक सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व युवक या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. घनश्याम दाभे .

बौद्धिक सभा





बौद्धिक सत्रामध्ये ग्रामिण भागातील शासकीय आरोग्य योजना या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. श्यामसुंदर निकम (जिल्हा शल्य चिकित्सक अम.)




बौद्धिक सत्रामध्ये मार्गदर्शन करताना मा. श्री राजाभाऊ पिढी (जनसंपर्क अधिकारी डायबेटीक असोसिएशन अमरावती)

बौद्धिक सत्र




रा. से. यो शिबिरामध्ये "तारुण्याच्या उंबरठ्यावर" या विषयावर मार्गदर्शन करताना. श्री. मनिष खांडपासोळे 'समन्वय' शिक्षा संस्था अमरावती.




डॉ. आशिष मोहे 'अज्ञात गोष्टी' या विषयावर मार्गदर्शन करताना.

सांस्कृतिक कार्यक्रम




सायकाळच्या सत्रामध्ये 'मनोरंजनातून समाज प्रबोधन' सादरकर्ते मा. विठ्ठलराज कौरे.





सायकाळच्या सत्रामध्ये कवि सम्मेलन सादर सहभागी कवी डॉ. ज्ञानेश्वर गडकर, डॉ. स्वप्निल देशमुख, विशाल मोहोड, सौ वैशाली वैराळे.

मान्यवरांची भेट





रा. से. यो शिबिराला सदिच्छा भेट दिल्यानंतर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना डॉ. राजेश बुरंगे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना स.गा.बा. अमरावती विद्यापिठ.




शोष खड्ड्याचे निरिक्षण करताना मा. डॉ. राजेश बुरंगे संचालक रा. से. यो. तसेच प्रा. डॉ संतोष यावले जिल्हा समन्वयक रा. से. यो.





प्रभात फेरीमध्ये सहभागी राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवक.




प्रभात फेरीमध्ये सहभागी रा. से. यो. स्वंयसेवक.




प्रभातफेरी दरम्यान वारकरी दिंडी काढताना
रा. से. यो. स्वयंसेवक.




प्रभात फेरी दरम्यान पथनाट्य सादर करताना
रा. से. यो. स्वयंसेवक




प्रभात फेरीदरम्यान अंधश्रद्धा निर्मुलनावर पथनाट्य सादर करताना रा.से.यो. स्वयंसेवक




प्रभात फेरीदरम्यान महिला सक्षमीकरणावर पथनाट्य सादर करताना रा.से.यो. स्वयंसेवक

सामुदायीक प्रार्थना




रा. से. यो. स्वंयसेवक आणि गुरुदेव सेवा मंडळ(लाडकी बु) सामुदायीक प्रार्थना करताना.





सामुदायिक प्रार्थने दरम्यान मार्गदर्शन करताना मा. श्री सुधाकरराव खैरकर (लाडकी बु)

# स्वच्छता अभियान



भिंदारू शाळा वळी ढगथीची (समोरील) स्वच्छता करताना रा. से. यो. स्वंयसेवक





लाडकी येथील बुद्ध विहारात स्वच्छता अभियान करताना रा. से. यो. स्वंयसेवक.

# भुमिगत बंधारा




मा. सरपंचा सौ सुंनहालाई भुयार आणि श्री डिंगाबर
भुरगे उपसरपंच, सदस्य, गावकरी मंडळी रा.से
यो. स्वयसेवकासह भुमिगत बंधाऱ्याचे भुमीपुजन करता




भुमिगत बधाऱ्याचे कार्य करताना राष्ट्रीय सेवा
योजना स्वंयसेवक व पाणी फांउडेशन टिम
मोर्शी.